
सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com www.goodeveningcity.com

७ एप्रिल २०२६, मंगळवार | वर्ष १४ वे | अंक ३११ | पृष्ठे ६




# समृद्धी महामार्गावर टँकरमधून गॅस गळती:जालना एक्झिटच्या पुढे वाहनांची २५ किमी.लांब रांग

**बुलढाणा, ७ एप्रिल (वृत्तसंस्था) :** गतिमान प्रवासासाठी हाती घेण्यात आलेला समृद्धी महामार्ग आता प्रवाशांसाठी चांगलाच अडचणीचा ठरू लागला आहे. मंगळवारी तारीख ७ तब्बल २५ किलोमीटरचा जाम लागल्यामुळे हजारो वाहने अडकून पडली आहेत. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असताना महामार्ग पोलिसांकडून मात्र हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवले जात आहे.

नागपूर ते मुंबई असा समृद्धी महामार्ग मागील दीड ते दोन वर्षात खुला करण्यात आला आहे. या मार्गावरून वाहनांचा गतिमान प्रवास होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र या मार्गावरून वाहतूक गतिमान होणे ऐवजी वारंवार वाहतूक ठप्प होण्याची प्रकार होऊ लागले आहेत. या समृद्धी महामार्गावर अपघात नित्याचे झाले असून अनेकांना जीव गमवावे लागले आहे. दोन दिवसांपूर्वीच या महामार्गावर सात मजुरांचा बळी गेला. त्यानंतरही या महामार्गाच्या वाहतुकीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे.



### *जालना एक्झिटच्या पुढे टँकरमधून गॅस लिकेज*

मंगळवारी (ता. ७) या महामार्गावर जालना एक्झिट च्या पुढे काही अंतरावर टँकर मधून गॅस लिकेज होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे या महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. दुपारपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. हजारो वाहने अडकून पडली आहेत. विशेष म्हणजे काही वाहने जालना एक्झिट जवळ असताना कार सारख्या छोट्या वाहनांना जालना एक्झिट वरून खाली उतरण्यासाठी रस्ता मोकळा करावा अशी मागणी प्रवाशांनी महामार्ग पोलिसांकडे केली. मात्र पोलिसांकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नसल्याने प्रवाशांमधून संतापाची भावना व्यक्त होऊ लागली आहे.

### *गैरसोयीमुळे प्रवाशांनी व्यक्त केला संताप*

या संदर्भात काही प्रवाशांनी समृद्धी महामार्गाच्या नियंत्रण पथकाशी संपर्क साधला असता त्यांनी मात्र महामार्ग सुरू असल्याचे सांगत अज्ञान प्रगट केले. मात्र प्रत्यक्षात २५ ते ३० किलोमीटर अंतरापर्यंतच्या वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महामार्गाच्या नियंत्रण विभागाच्या या अज्ञानावरही प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. या महामार्गावरून पोलिसांसोबतच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची वाहने धावत असल्यामुळे आता महामार्ग खुला होईल अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. मात्र उपप्रादेशिक परिवहन विभाग देखील या जाम पासून अनभिज्ञ असल्याचे दिसून आले




भाड्याने देणे/विकणे आहे

हॉल, रुम, दुकाणे

चिखली बुलढाणा रोडवर ५५०० स्क्वेअर फूट पाण्याची व्यवस्था स्वच्छालयासह संपूर्ण सुविधा असलेला हॉल

मो.नं. : 9921439531, 9422950325

# हिमाचलमध्ये भूस्खलनामुळे सिंयूर पूल कोसळला

**नवी दिल्ली, ७ एप्रिल (वृत्तसंस्था) :** हिमाचल प्रदेशातील चंबा येथे आज सकाळी भूस्खलनामुळे एक बांधकाम सुरू असलेला पूल कोसळला. भरमौर आणि होली भागाला जोडणारा सिंयूर पूल रावी नदीत वाहून गेला. यामुळे परिसरातील अनेक गावांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे, ज्यामुळे लोकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.



सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) गेल्या २ वर्षांपासून या पुलाचे बांधकाम करत होता. सुमारे ४ कोटी रुपये खर्चून बांधल्या जात असलेल्या या पुलाच्या दोन्ही बाजूंना स्टीलच्या रेलिंगचे काम पूर्ण झाले होते. पुढील काही महिन्यांत या पुलावरून वाहनांची वाहतूक सुरू होण्याची अपेक्षा होती. त्यापूर्वीच आज सकाळी आठच्या सुमारास डोंगरावरून मोठा ढिगारा आणि खडक पुलावर कोसळले. यामुळे पुलाचा एक कोपरा नदीत वाहून गेला. भूस्खलनानंतर जोरदार आवाज ऐकू आले आणि २०० फूट उंचीपर्यंत धुळीचे लोट उसळले.

या पुलाचे बांधकाम मोठ्या वाहनांच्या वाहतुकीसाठी केले जात होते. यासोबतच एक दुसरा लाकडी पूल आहे, ज्यावर फक्त लहान वाहनांची वाहतूक होते. दुर्गम भरमौर परिसरात खडा मुख–होळी मार्ग बंद झाल्यावर या पुलाचा पर्यायी मार्ग म्हणून वापर केला जात होता.

DWARKA BAHUDDESHIYA GRAMIN VIKAS FOUNDATION's (reg.no. F-5333)

RAJARSHI SHAHU MAHARAJ AYURVED COLLEGE, HOSPITAL AND RESEARCH CENTRE, BULDHANA

Address: Near Palna Ghar, Sagwan, Buldhana 443001

(Approved By Dept. of AYUSH Govt. Of India, NCISM New Delhi, DMER Govt. of Maharashtra, Mumbai, Affiliated to MUHS Nashik)

NCISM Code: AYU0882 rsmayurvedcollegebul@gmail.com MUHS College Code: 125134

Jt. Secreatary: Adv. Kirtitai Parhad -:- Secretary: Mrs. Padmatai D. Sawle -:- President: Shri. Dhrupatrao B. Sawle (Ex. MLA)

rsmayurvedbul@gmail.com Phone No. 9168101017

WALK IN INTERVIEW

Applications are invited for filling up the following posts in the above Said College/Institute & Interview will be held on 21/04/2026 at 9.00 am.

| Sr. no. | Type of Post | Vacant Post | | |
|---|---|---|---|---|
| | Dept./ Subject | Professor | Associate Professor | Assistant Professor |
| 1 | Principal | 01 (OPEN) | -- | -- |
| 2 | Samhita & Siddhant | -- | -- | 01 (OPEN) |
| 3 | Kriya Sharir | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 4 | Rachana Sharir | 01 (OPEN) | -- | 01 (OPEN) |
| 5 | Dravyaguna | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 6 | Rasashastra | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 7 | Rognidan | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 8 | Swasthvritta | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 9 | Agadtantra | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |

Note– 1. Experience as per NCISM/MUHS Norms.
2. Candidate should be registered under the MMP Act 1961/MMC Act 1970 before joining the post unless they have already so registered.
3. Interview will be conducted as per MUHS direction 01/2017.
4. Be present on the day of interview with application And all necessary documents.

Sd/- Principal Sd/- Chairman



महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

## जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा

**शाखा :- भूसंपादन (इमारत व दळणवळण)**
**स्टेट बँक चौक, बुलढाणा ता.जि. बुलढाणा पिन कोड ४४३००१**

जा.क्र. उपजि. भूसं (इवद)/म.स./कावि/७६/२०२६ दिनांक: १६.०३.२०२६

# प्रारंभिक अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम- २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३/२०२५-२०२६ मोजे निमगांव व मौजे रामपुर (मौजे रोटी येथील गावठाणा करीता) ता.नांदुरा जि. बुलढाणा

ज्याअर्थी. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचां आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२)/ अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आलेला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (अंड अं) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील १०००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनयमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, बुलढाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांरा यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमोन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निदेश उक्त सार्वनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलंल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अर्धानयमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते को, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे:

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने याधीत व्यवतीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत; आणि ज्याअर्थी. सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त.. केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता. असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाहो;

परंतु, उक्त जमिनीच्या अधवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रर्वतनातून सूट देता येईनः

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोपात्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) च्या नियम १० च्या उर्पनयम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अदयावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी. उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी भूसंपादन (इमारत व दळणवळण), जिल्हाधिकारी कार्यालय,** बुलढाणा यास पदनिर्देशीत करीत आहे.

## अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

**गाव :- मौजे निमगांव व रामपुर (मौजे रोटी येथील गावठाण करीता) ता. नांदुरा जिल्हाः- बुलढाणा**

| मौजे निमगांव ता.नांदुरा जि.बुलढाणा | | |
|---|---|---|
| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक मौजे निमगांव | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
| १ | ९२२ | २.०३ |
| २ | ९२२ | ०.४० |
| ३ | ९२२ | ०.४१ |
| ४ | ९२२ | १.२३ |
| ५ | ९२३ | ०.३८ |
| ६ | ९२३ | ०.५२ |
| ७ | ९२४ | १.०८ |
| ८ | ९२४ | १.३५ |
| ९ | ९२५ | ०.१४ |
| १० | ९२५ | १.२१ |
| ११ | ९२६ | ०.७८ |
| १२ | ९२८ | ०.३४ |
| १३ | ९२८ | ०.२० |
| १४ | ९२९ | ०.३२ |
| १५ | ९३० | ०.२० |
| १६ | ९५५ | ०.२० |
| १७ | ४७ | ०.४२ |
| १८ | ४७ | ०.४२ |
| १९ | ४८ | ०.४४ |
| २० | ४८ | ०.८१ |
| २१ | ४९/१ | ०.९५ |
| २२ | ४९/२ | १.०० |
| २३ | ४९/३ | ०.८६ |
| २४ | ४९/४ | १.२० |
| २५ | ४९/४ | ०.८० |
| | एकुण | १७.६९ |

## अनुसूची-दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :- जिगांव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा**

**प्रकल्प कार्याचे वर्णन :- कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव**

**प्रकल्पाचे समाजाला मिळणारे लाभ :-** या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, उदयोगधंदयांना पाणी पुरवठा होणार आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन, शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्यामुळे त्यांच्या जिवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

## अनुसूची-तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : निरंक**

## अनुसूची-चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-**

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ असाधारण क्र.३८ दिनांक १३.०३.२०१.५ नुसार कलम १०-क मध्ये नमुद केलेला सर्व प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन च्या तरतुदी लागू करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे. त्यात प्रकल्पाची यादी (ख) मध्ये विद्युतीकरण, सिंचन, रस्ते, पाणी पुरवठा व जलसंधारण यासंह ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा याचा समावेश आहे.

भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक J१२०११/२२/२००७/१A.१/ दिनांक ११.०५.२००७ अन्वये जिगांव या मोठ्या सिचंन प्रकल्पाला पर्यावरण विषयक सर्वेक्षण मंजुरी प्रदान करण्यात आल असून महाराष्ट्र शासनाचे राजपत्र भाग चार अ असधारण क्रमांक ३८ दिनांक १३ मार्च २०१५ भुमोसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदंर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ६ (२) मधील्लू परंतुकानुसार सामाजिक आघात निर्धारणाशी संबंधित असणा-या तरतुदी जलसिंचन प्रकल्पाला लागू होणार नाहीत.

## अनुसूची-पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-**

सदर प्रकरणात भूधारकांची खाजगी शेतजमीन संपादीत होत आहे. त्यामुळे प्रशासकाचा नगशिल निरंक समजण्यात यावा.

**दिनांक :१६.०३.२०२६**

**ठिकाण :- बुलढाणा**

(अजिंक्य गोडगे)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन (इवद) बुलढाणा

Digitally signed by
KIRAN NEMGONDA PATIL
Date: 16-03-2026
10:52:14
(डॉ. किरण पाटील भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, बुलढाणा

**जिमाका/बुल/जाहि/०२/२०२६**

निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

गुड इव्हिनिंग City

# डिहायड्रेशन टाळण्यासाठी...

**काहिली वाढतेय. उन्हाळ्यावर मात करण्यासाठी शरीरात पाण्याचे प्रमाण योग्य राखणे हाच सर्वोत्तम उपाय आहे. जगण्यासाठी तुमचे शरीर पाण्यावर अवलंबून असते. आपल्या शरीराच्या वजनाच्या अर्ध्याहून अधिक वजन पाण्याचे असते, प्रत्येक अवयवाला कार्यक्षम राहण्यासाठी पाण्याची गरज असते. तहान लागणे, वात येणे किंवा डोकेदुखी यासारखी डिहायड्रेशनची लक्षणे दिसण्याची वाट न पाहता तातडीने पावले उचला...**

प्यायलेल्या पाण्याच्या प्रमाणापेक्षा शरीरातून अधिक पाणी गमावणे या अवस्थेला निर्जलीकरण किंवा डिहायड्रेशन असे संबोधण्यात येते. लघवी, मल, घाम तसेच उच्छवासावाटेही रोज शरीरातून पाण्याचा निचरा होत असतो. पाण्याबरोबरच शरीर काही प्रमाणात क्षारही गमावते. शरीरातून पाणी गमावणे ही सामान्य प्रक्रिया आहे. परंतु, जर हे प्रमाण वाढले तर डिहायड्रेशनचा त्रास होतो. तहान लागण्याची वाट पाहू नका. ज्यावेळी तुमचे तोंड कोरडे होते, त्यावेळी तुमच्या शरीरात निर्जलीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे असे समजावे. लघवीचा रंगही आपण किती प्रमाणात पाणी प्यावे हे सांगणारा निदर्शक आहे. योग्य प्रमाणात पाणी प्यायल्यास लघवीचा रंग फिकट किंवा रंगहीन दिसतो.

## किती पाणी प्यावं ?

शरीराच्या पाण्याची गरज तुमच्या वजनावर अवलंबून असते. जर तुमचे वजन ६० कि.ग्रॅ. असेल तर तुम्हाला दर दिवशी दोन लीटर पाणी पिणे गरजेचे आहे. जर तुम्ही उन्हात जाणार असाल किंवा व्यायाम करणार असाल तर तुम्हाला अधिक पाण्याची गरज भासू शकते. पाणी पिण्याची सवय लावून घ्या. पाणी पिण्याची सवय लागली पाहिजे. पाण्याची बाटली सदैव तुमच्या जवळ बाळगा. साधे पाणी शरीरात पटकन शोषले जाते, त्यामुळे त्याचे अधिकाधिक सेवन करा. पाण्याचे प्रमाण अधिक असलेले पदार्थ खा. तुमच्या पाण्याची गरज भागविण्याची आणि पाण्याचे प्रमाण राखण्याचा हा चांगला मार्ग आहे. कलिंगड, खरबूज यासारखी फळे खा. लिंबू, संत्रे आदी लिंबुवर्गीय फळे केवळ शरीराला पाणी पुरवत नाही तर इलेक्ट्रोलाइटचाही पुरवठा करतात. काकडी आणि टोमॅटो खा यात वजनाच्या ९० टक्क्यांहून अधिक प्रमाणात पाणी असते. उन्हाळ्यात आपल्याला जास्त घाम येतो आणि त्यावाटे आपण शरीरासाठी महत्त्वाची असलेली खनिजेही गमावतो. काकडीच्या माध्यमातून पोटॅशिअमचा पुरवठा शरीराला होतो.

## ग्रीन टीकडे वळा

कॅफिनचा समावेश असलेल्या चहा, कॉफी, कोलास आणि चॉकलेट उन्हाळ्यात टाळा. हे पदार्थ लघवीची अधिकाधिक निर्मितीला चालना देते. नारळ पाणी आपल्या शरीराला योग्य प्रमाणात पाणी पुरवते. त्यात मानवी पेशी आणि प्लाझ्माला आवश्यक इतके इलेक्ट्रोलाइट्स असतात. शरीराचे अंतर्गत तापमान वाढवून पाण्याचा निचरा अधिक होण्यास मसालेदार पदार्थ कारणीभूत असतात. कामासाठी बाहेर पडण्याचे ठरवाल. तेव्हा काम सुरू करण्याआधी दर १- २ तासाला दोन ग्लास पाणी प्या. ज्यामुळे तुमच्या शरीरात पाण्याचे योग्य प्रमाण असेल. जेवणाआधी एक ग्लास पाणी प्या. घरात काम करतानाही पाण्याची बाटली जवळ बाळगा.





# ओव्हर हायड्रेशन

## जास्त पाणी पिणेही घातक


**संपूर्ण भारतात उष्णतेच्या लाटा येत आहेत. यामुळे शरीराचे तापमान वाढत आहे. उष्णतेमुळे शरीर हायड्रेटेड ठेवणे अर्थात शरीरात मुबलक प्रमाणात पाणी असणं गरजचे आहे. पाणी नेहमीचं आवश्यक आहे. कारण मानवी शरीरात ७० टक्के पाणी असते. उन्हाळ्यात डिहायड्रेशन खूप लवकर होते आणि अशावेळी सर्व प्रकारचे ज्यूस, पाणी, इलेक्ट्रोलाइट पेयं आणि इतर पेयांचे सेवन अवश्य केले जाते. ओव्हरहायड्रेशनमुळे भ्रम निर्माण होणे, चक्कर येणे, मळमळ होणे आणि पाण्याची विषबाधा या सारखी परिस्थिती उद्भवते. यामुळेच, डिहायड्रेशन तुमच्यासाठी वाईट असले तरी, ओव्हरहायड्रेशनही तितकेच वाईट असू शकते. ओव्हरहायड्रेशन आणि जास्त पाणी पिण्याचे धोके अधिक सखोलपणे समजून घ्या...**

## ओव्हर हायड्रेशन म्हणजे काय ?

तुमचे मूत्रपिंड सुरक्षितपणे जेवढं पाणी ( लघवी ) शरीरातून काढून शकते त्यापेक्षा जास्त अर्थात शरीराच्या गरजेपेक्षा जास्त पाणी पिता तेव्हा ओव्हरहायड्रेशन होते. यामुळे तुमच्या शरीरात सोडियम आणि इतर आवश्यक इलेक्ट्रोलाइट्सचे असंतुलन होते, ज्यामुळे हायपोनॅट्रेमिया आणि पाण्याची विषबाधासारख्या परिस्थिती उद्भवतात. हायपोनाट्रेमिया म्हणजे जास्त पाण्यामुळे तुमच्या रक्तातील सोडियमची पातळी कमी होणे. सोडियम तुमच्या पेशींमधील आणि बाहेरील पाण्याचे प्रमाण नियंत्रित करते. जेव्हा ते कमी होते, तेव्हा तुम्हाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागतात जसे की, डोकेदुखी, भ्रम, मळमळ, अस्वस्थता, थकवा, स्नायू आवळले जाणे. यावर उपचार न केल्यास अधिक गंभीर समस्या जसं की, अगदी कोमाची स्थितीही निर्माण होऊ शकते.

## ओव्हर हायड्रेशन आणि वॉटर पॉइझनिंग कशामुळे होतं ?

पाण्याची विषबाधा आणि हायपोनेट्रेमिया सामान्यपणे पाणी पिताना होत नाही. पिण्याच्या पाण्यापेक्षा जास्त पाणी पिण्यासारख्या प्रकरणांमुळे किंवा लष्करी प्रशिक्षणात जास्त प्रमाणात पाण्यामुळे विषबाधासारखी स्थिती निर्माण होते. पाण्यातून विषबाधा होण्याची फारशी प्रकरणे दिसत नाहीत. हे डिहाइड्रेशनच्या प्रकरणांपेक्षा खूपच कमी आहे. लष्करी प्रशिक्षणात सैनिकांमध्ये पाण्याची विषबाधा झाल्याचे अनेकदा दिसून येते. यूएस आर्मीच्या अभ्यासात असे आढळले की तीन प्रशिक्षणार्थी पाण्याची विषबाधा झाल्यामुळे मरण पावले, तर वर्षभरात पाण्याच्या इनटॉक्सिकेशन आणखी १७ सैनिकांना रुग्णालयात दाखल करावे लागले.



## काही इतर काही कारणे असू शकतात...

- फोर्सफुल व्यायामादरम्यान ओव्हरहायड्रेशन : लष्करी प्रशिक्षणात पाण्याची विषबाधा, व्यायामादरम्यान अतिउष्णता किंवा अतिहायड्रेशनमुळे तुमच्या शरीरातील सोडियमचे प्रमाण कमी होऊ शकते. घामाच्या वेळी शरीरातून बाहेर पडणाऱ्या इलेक्ट्रोलाइट्सची भरपाई करणाऱ्या पेयांऐवजी फक्त पाणी प्यायल्याने पाण्याचा इनटॉक्सिकेशन होऊ शकते.
- उष्णतेशी संबंधित ओव्हर-हायड्रेशन : जेव्हा तापमान वाढते तेव्हा आपले शरीर थंड राहण्यासाठी घाम येतो. जेव्हा तुम्हाला घाम येतो तेव्हा तुम्ही शरीरातील भरपूर पाणीदेखील गमावता. ज्यामुळे तहान लागते. तहान लागल्यावर आपण पाणी पितो. पण जेव्हा उष्णतेचा पारा ४० अंश सेल्सिअस ओलांडतो तेव्हा सतत पाणी पिण्याची इच्छा होते. मग एका ठराविक वेळेनंतर तुम्ही घामाने इतके इलेक्ट्रोलाइट्स आणि पाणी गमावता आणि त्यावर जास्त पाणी प्यायल्याने तुमचे इलेक्ट्रोलाइट्स आणखी कमी होत आहेत. यामुळे डोकेदुखी, चिडचिड, भ्रम आणि काही प्रकरणांमध्ये पाण्याची विषबाधाही होऊ शकते.
- किडनीचा आजार : तुम्हाला किडनीचा गंभीर आजार किंवा किडनीच्या इतर समस्या असल्यास, यामुळे तुमच्या शरीरात पाणी साचून राहू शकते. तुमची किडनी दर तासाला शरीरातून सुमारे अर्धा लिटर द्रव बाहेर काढू शकते. जेव्हा तुम्ही जास्त पाणी पिता तेव्हा तुमचे मूत्रपिंड जास्त पाणी लवकर बाहेर काढू शकत नाहीत आणि त्यामुळे सोडियमचा साठा कमी होतो. जर तुम्ही किडनीच्या आजाराने त्रस्त असाल तर परिस्थिती आणखी बिकट होते. यामुळे स्नायुंचे आकुंचन, मळमळ, चक्कर येणे आणि उपचार न केल्यास, पाण्यातील विषबाधा होते.
- MDMA सारख्या ॲम्फेटामाइन्सचा वापर : MDMA ( ज्याला सर्वसामान्य भाषेत ई, एक्स्टेसी, कँडी म्हणतात ) सारख्या शारीरिक हालचाल वाढवणाऱ्या ॲम्फेटामाइन्सच्या वापरामुळे थकवा, जास्त घाम येणे आणि जास्त तहान लागणे होऊ शकते. कधीकधी यामुळे अति-हायड्रेशन होते. अत्याधिक शारीरिक हालचाली आणि MDMA या दोन्हीमुळे तुमच्या शरीरात लघवीद्वारे बाहेर टाकले जाणारे पाणी वाढते, ज्यामुळे जलद इलेक्ट्रोलाइट पातळ होणे, पाण्याचे विषबाधा आणि मृत्यू देखील होऊ शकतो.
- सायकोजेनिक पॉलीडिप्सिया : सायकोजेनिक पॉलीडिप्सिया हा एक मानसिक आजार आहे ज्यामुळे जास्त पाणी पिण्याची इच्छा होते. याला सामान्यतः याला शरीरातील पाण्याने होणारी विषबाधा असं देखील म्हणतात. या स्थितीत रुग्ण जास्त प्रमाणात पाणी पिण्यास सुरुवात करतो. रुग्ण पाण्याच्या विषबाधेचा बळी होईपर्यंत हे चालूच असते. जर रुग्णाला उपचार मिळाला नाही तर लवकरच हा रोग जीवघेणा ठरू शकतो किंवा रुग्णासाठी अत्यंत धोकादायक स्थिती निर्माण करू शकतो. जबरदस्तीने जास्त प्रमाणात पाणी प्यायल्याने समस्या उद्वू शकतात जसे की, मळमळ, भ्रम आणि चक्कर येणे.

## ओव्हर हायड्रेशन आणि पाण्याचे इनटॉक्सिकेशन कसं टाळायचं ?

जर तुम्ही उष्ण तापमानामध्ये जास्त शारीरिक मेहनत करत असाल किंवा खूप वेळ उन्हात घालवत आहात तर, तुम्ही सतत पाणी प्यायला हवं. पण तुम्ही नारळ पाणी, ताक, ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन, साखर आणि मीठ, लिंबू सरबत यांसारखी इलेक्ट्रोलाइट पेये पिऊ शकता आणि तुम्हाला कसे वाटतं याकडे लक्ष द्या. जर हे शक्य नसेल, तर साधे पाणी पिणे बंद करा आणि त्याऐवजी खारट मीठ टाकलेले पाणी प्या. तथापि, हे सर्व केवळ तात्पुरते उपाय आहेत आणि जर तुम्हाला शंका असेल की तुम्हाला पाण्याचा इनटॉक्सिकेशन किंवा पाणी विषबाधा आहे, तर तुम्हाला डॉक्टरांना भेटण्याची आवश्यकता आहे. डिहायड्रेशन आणि ओव्हरहायड्रेशन दोन्ही लोकांमध्ये समान लक्षणे दिसू शकतात. म्हणून वैद्यकीय तज्ञाचा सल्ला घेणे कधीही उत्तम पर्याय आहे.

# युवा

गुड इव्हिनिंग City

# Breakup झालंय?


## या गंभीर आजारांशी होऊ शकतो सामना!

**ब्रेकअप होणं ही खूपच वेदनादायी गोष्ट आहे. ब्रेकअपमधून बाहेर पडणे प्रत्येकासाठी सोपे नसते. जेव्हा तुम्ही ब्रेकअपमधुन जात असता तेव्हा अनेक गोष्टी तुमच्या डोक्यामध्ये असतात. जेव्हा तुमचे खरे प्रेम तुमचा वाईट पद्धतीने विश्वासघात करते आणि तुमच्याशी सर्व संबंध तोडते तेव्हा खूप वेदना होतात. आयुष्यात काही करु नये असं त्यांना वाटत असतं. पण तुम्हाला माहित आहे का की ब्रेकअपचा परिणाम तुमच्या मनासोबतच तुमच्या शरीराला देखील होतो. कधी कधी ही परिस्थिती इतकी भयंकर बनते की लोक पूर्णपणे उद्ध्वस्त होतात. जेव्हा आपण दुःखी असतो तेव्हा आपण स्वतःला त्रास करुन घेतो. याकाळात आपला योग्य आहार घेत नाही. त्यामुळे त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. तसेच असेच चालू राहिले तर आपल्याला अनेक आजार देखील होऊ शकतात. ब्रेकअप केवळ त्याच्या मनच नाही तर माणसाचे शरीर पूर्णपणे पोकळ बनवते.**

- छातीत वेदना होणं : जेव्हा कोणी आपले मन मोडते तेव्हा त्याचा परिणाम आपल्या छातीवर होतो. त्यामुळे आपल्या छातीत विचित्र वेदना होतात. या काळात आपला मेंदू अनेक भावनिक गोष्टीमधून जात असतो त्यामुळे आपल्याला या वेदना जाणवतात.वेदना दिसू शकत नाहीत परंतु त्याचा शरीरावर वाईट परिणाम होतो. कधीकधी या वेदनामुळे माणूस खूप आजारी पडतो. छातीतील वेदना फार काळ राहिल्या तर त्याचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम करु शकतात.
- हृदयविकाराचा झटका : एका संशोधनानुसार, ब्रेकअपनंतर हृदयात अशांतता निर्माण होऊ शकते असे समोर आले आहे. तुमच्या हृदयाची काळजी घेणं महत्त्वाचं आहे. जेव्हा मनात अनेक विचार असतात त्याचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. ताण तुमच्या शरीरावर परिणाम करू शकतो. अशा गोष्टींमध्ये स्वतःला व्यस्त ठेवणे हा एकमेव उद्देश तुमच्या समोर असायला हवा. यासाठी स्वतःला अशा गोष्टींमध्ये व्यस्त करुन ठेवा ज्यामध्ये तुमचे लक्ष विचलित होणार नाही.
- मानसिक तणाव : मानसिक तणाव तुम्हाला अनेक प्रकारे आजारी बनवू शकतो. कारण जेव्हा तुम्ही हार्ट ब्रेकमधून जातो तेव्हा तुमचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते. यामुळे वजनामध्ये वाढ होणं मासिकपाळी चुकणे PCOD यांसारख्या समस्या येतात. यासाठी थोडसं चालणं व्यायाम करणं आणि गरम पाणी पिणे यांसारख्या गोष्टी करा. त्यामुळे तुम्हाला फायदा होईल.
- प्रतिकारशक्ती कमी होते : ज्याच्याकडून आम्हाला खूप आशा आहेत, जर अशा व्यक्तीने तुमचा विश्वासघात केला तर त्याचा परिणाम तुमच्या प्रतिकारशक्तीवर होतो. एका अभ्यासानुसार, ब्रेकअपनंतर प्रतिकारशक्ती कमी होते, ज्यामुळे तुम्ही आजारी पडतात. अशा परिस्थितीत भरपूर पाणी प्यावे, असा सल्ला तज्ज्ञ देतात.

# सैल होणारी बेडी...

**लग्न हे नक्कीच वाटतं तितकं सोप्पं नातं नाही आहे. एकाच व्यक्तीसोबत एकाच घरात आयुष्यभर सोबत राहण्याची ही कल्पना अगदी सुखावणारी वाटत असली तरी ती प्रत्येकालाच पचनी पडते असं नाही आणि म्हणूनच म्हणतात की लग्नाचा निर्णय हा कधीच घाईत घेऊ नये. नीट विचार करावा आणि आपण जेव्हा कोणत्याही संसारिक संकटासाठी तयार असू तेव्हाच या बेडीत अडकावे. अनेकजण खूप विचार करून व तयारीनिशी लग्न करतात आणि म्हणून त्यांची लग्न टिकतात तर अनेकजण विचार न करता घाई घाईत निर्णय घेतात आणि मग सगळाच खेळखंडोबा होतो. लग्नानंतर नात्यात समस्या येणे ही मोठी गोष्ट नाही पण ती समस्या न सुटणे ही मोठी गोष्ट आहे. काहीजण या वर मार्ग काढतात तर काहींना काढता येत नाही आणि गोष्टी अधिक ताणल्या जातात. आज आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टी सांगणार आहोत ज्या संकेत देतात की हे नातं आता संपलं आहे. खाली दिलेल्या ५ गोष्टी दिसल्यानंतर बहुतेक कपल्सची संसार करण्याची इच्छाच संपते, ते आशा सोडून देतात. तुमच्याही नात्यात ही स्टेज आली नाही ना..?**






- संवाद संपणे : संवाद हा नात्याचा एक महत्त्वाचा धागा असतो. कितीही काहीही झालं तरी संवाद संपला नाही पाहिजे. भले एकमेकांशी भांडा पण बोलणे टाकू नका. ज्या कपल्समध्ये बोलणेच होत नाही त्यांचे हळूहळू एकमेकांबद्दलचे मत बदलत जाते. हळूहळू दोघेही नात्याबद्दलच्या अपेक्षा सोडून देतात. प्रयत्न करणे सोडून देतात. अनेकदा अशावेळी इगो आड येतो. नेमका पुढाकार घ्यायचा कोणी हाच संभ्रम नाते कायमचे तोडून टाकतो. त्यामुळे संवाद संपला की समजून जावं हे नातं संपलं आहे.
- ओढ संपणे : आपल्या समाजात नेहमी एक गोष्ट बिंबवली जाते की, शारीरिक प्रेमापेक्षा मानसिक प्रेम हे महत्त्वाचे आहे पण असे नसते. दोन्हींचा समतोल राखता आला पाहिजे. ज्या नात्यात शारीरिक जवळीक नसेल, शारीरिक सुख नसेल ते नाते मुळातच नाते म्हणता येणार नाही. कारण ओढ तेव्हाच निर्माण होते जेव्हा एकमेकांकडून सुख मिळते. अनेकदा बऱ्याच कारणांमुळे कुठेतरी या जवळकीमध्ये खंड पडतो आणि मग हळूहळू हा खंड मोठा होऊ लागतो व एक वेळ अशी येते की दुसऱ्या कोणाच्या तरी सहवासाची गरज भासू लागते. ही स्थिती सुद्धा दर्शवते की नाते संपलेले आहे.
- वागणुकीतील बदल : वागणूक ही अशी गोष्ट आहे ज्यामधून व्यक्तीबाबत अनेक गोष्टी कळतात. एक हेल्दी रिलेशनशिप ती असते ज्यात पार्टनर्स रोज एकमेकांसोबत हसून खेळून बोलतात, ऑफिसला जाताना एकमेकांना गुड बाय करतात. एकमेकांची दिवसभर विचारपूस करतात, काळजी घेतात. पण जेव्हा या सगळ्या गोष्टी बंद होतात आणि दोन अनोळखी लोकं एकमेकांसोबत राहत आहेत. त्याप्रमाणे राहू लागतात तेव्हा ती वागणूक दाखवून देते की नात्यामध्ये काहीच उरलेले नाही.
- अफेयर असणे : लग्नाचा जोडीदार असताना सुद्धा दुसऱ्या व्यक्तीबाबत आकर्षण निर्माण होणे किंवा दुसऱ्या व्यक्तीचा सहवास हवाहवासा वाटू लागणे म्हणजेच नात्यामध्ये रस नसणे होय. जेव्हा असे वाटू लागते आणि लग्नापेक्षा अफेअरला जास्त महत्त्व दिले जाते तेव्हा ते नाते कधीच ठीक होणार नसते. कोणीही कितीही प्रयत्न केला तरी ते दोन कपल्स पुन्हा एकत्र येण्याची शक्यताअगदीच शून्य असते.

### अजिबात न भांडणे

आपण बऱ्याचदा म्हणतो की ज्या नात्यात भांडणेच होत नाहीत ते नाते किती मस्त असेल. पण मंडळी असे अजिबात नसते. ज्या नात्यात भांडणे होत नाहीत ते नाते चांगले असेलच असेही नाही. स्वतः जाणकार सुद्धा सांगतात की ज्या नात्यात भांडणेच होत नसतील अशा कपल्समध्ये एकमेकांविषयी ओढच नसते. ते आपल्या पार्टनरला हवे ते करून देतात आणि याचाच अर्थ असा की त्यांना नात्याची काहीच काळजी राहिलेली नाही. त्यांनी नाते सोडून दिले आहे. त्यामुळे लक्षात घ्या की थोडे तरी भांड्याला भांडे लागले पाहिजे. यातून एकमेकांविषयीचे प्रेम अधिक वाढते.

# स्लीप डिवोर्स चांगला पर्याय

- स्लीप डिव्होर्स म्हणजे काय? : स्लीप डिव्होर्स तेव्हा होतो जेव्हा कपल्स एकत्र राहतात पण चांगली झोप मिळावी म्हणून वेगळ्या बेडरूममध्ये झोपणे पसंत करतात. परिस्थितीनुसार, स्लीप डिव्होर्स दीर्घकालीन किंवा तात्पुरता असू शकतो. यामध्ये केवळ झोपायला मिळणे हा एकच कळीचा मुद्दा असतो आणि यच मुद्द्यावर कपल्स झोपताना वेगळे होतात. बाकी गोष्टींचा त्यांचा या स्लीप डिव्होर्सशी थेट संबंध नसतो. ही एक नवीन संकल्पना आहे जी आजच्या पिढीत झपाट्याने वाढताना पहायला मिळते आहे.
- स्लीप डिव्होर्स घेणे चांगले आहे का? : आपल्याला खरोखर स्लीप डिव्होर्सची गरज आहे का? तर त्याचे उत्तर आहे की कदाचित होय. आपल्या सर्वांना माहित आहे की निरोगी जीवनशैलीसाठी चांगली झोप खूप महत्वाची आहे. पण एका जोडीदाराच्या झोपण्याच्या काही सवयी दुसऱ्या जोडीदाराच्या झोपेला खराब करू शकतात. अशा परिस्थितीत जर तुमच्या जोडीदाराच्या झोपण्याच्या सवयींमुळे तुम्ही झोपेशी तडजोड करत असाल तर स्लीप डिव्होर्स विचार करणे चुकीचे नाही. कारण झोपच नीट मिळाली नाही तर हळूहळू त्याचा पूर्ण परिणाम तुमच्या एकूण आयुष्यावर होऊ लागतो.
- यामुळे नाते खराब होते का? : स्लीप डिव्होर्सचा



अर्थ असा नाही की तुमच्या नातेसंबंधावर परिणाम होईल. वेगवेगळे झोपणे ही कोणत्याही कपल्सची वैयक्तिक निवड आहे. एकमेकांवर मनापासून प्रेम करणाऱ्या दोन व्यक्ती याबाबतीत एकमेकांना नक्कीच समजून घेऊ शकतात. लक्षात ठेवा, झोपेच्या घटस्फोटाचा अर्थ असा नाही की तुम्ही एकाच पलंगावर एकत्र वेळ घालवू शकत नाही. जर तुम्हाला वाटले की आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराची गरज आहे तर तुम्ही त्याच्या सोबत बेड शेअर करू शकता. एक दिवस त्याचा त्रास सहन करू शकता. पण जेव्हा तुम्हाला शांत झोप हवी असले तेव्हा स्लीप डिव्होर्स घेणे चांगले.
- स्लीप डिव्होर्स कसा घ्यावा : आपल्या जोडीदाराला स्लीप डिव्होर्स घ्यायला तयार करणे हे नक्कीच सोप्पे नाही. ज्यांना माहित आहे ते ही गोष्ट लगेच समजून घेऊ शकतात, पण ज्यांना माहित नाही त्यांना ही संकल्पना समजावून सांगायलाच खूप वेळ जाऊ शकतो. जर तुम्ही दोघे एकमेकांना होणार त्रास समजून घेऊ शकलात तर स्लीप डिव्होर्स घेणे खूप सोप्पे आहे. शेवटी जरी यात डिव्होर्स हा शब्दसला तरी केवळ झोपण्यासाठी तुम्ही वेगळे होत असता, आयुष्यभरासाठी नाही. झोपेत तुम्हाला होणारा त्रास मनमोकळेपणाने तुम्ही जोडीदारापुढे बोलून दाखवा, जर तो समजूतदार असेल तर नक्कीच यावर विचार करेल.
- स्लीप डिव्होर्सचे फायदे काय आहेत? : उत्तम झोप मिळावी म्हणून स्लीप डिव्होर्स खरंच खूप फायदेशीर आहे. यामुळे कपल्सना त्यांचा पर्सनल स्पेसही मिळतो. वेगळ्या बेडवर झोपल्याने चांगली झोप लागते. झोपेत अडथळा आणणारं तिथे कोणी नसतं. कपल्स एकमेकांसोबत न झोपताही जवळीक निर्माण करू शकतात. तर असे आहेत या नव्याकोऱ्या स्लीप डिव्होर्स नामक संकल्पनेचे फायदे!

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
७ एप्रिल २०२६, मंगळवार

# बुलढाण्यात दृश्य व अदृश्य स्वरूपात ईडीची एन्ट्री : आ. विजयराज शिंदे

## मुन्ना बेंडवाल यांचे आमदार गायकवाडांवर आरोप



**बुलढाणा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा जिल्ह्यात सध्या सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा सामना रंगणे अपेक्षित असताना सत्ताधारी विरुद्ध सत्ताधारी असा महायुतीतला सामना रंगत आहे. कुठल्याही राजकीय पक्षात व मित्र पक्षात शीतयुद्ध सुरू असतेच पण बुलढाण्यात मात्र खुलेपणाने विरोध दर्शवला जात आहे. सुरुवातीला आमदार संजय आणि आमदार श्वेता महाले यांच्यात वाद निर्माण झाला. त्याला आता पंधरा दिवस झाले. पण हा वाद थांबण्याचे नावच घेताना दिसत नाही.

आ. महाले सध्या केरळ राज्यात प्रचार करण्यासाठी प्रभारी म्हणून कार्य करत असल्यामुळे त्या केरळ मध्ये आहेत. त्यामुळे घडत असलेल्या घटनांवर त्यांच्या प्रतिक्रिया आल्या नाही. पण आता या वादात माजी आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी उडी घेतली आहे. आ. गायकवाड आणि विजयराज शिंदे यांचे सौख्य जिल्ह्यालाच नाही तर राज्याला माहिती आहे. भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी आज त्यांच्या शिवालय जनसंपर्क कार्यालयावर पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी विजयराज शिंदे यांनी सांगितले की, आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा विधानसभा मतदारसंघात भाजपच्या पदाधिकाऱ्यांना कामे दिल्याचा दावा केला आहे. तो त्यांचा दावा खोटा आहे त्यांनी कुठल्याच पदाधिकाऱ्याला काम दिले नाही. ३५ कोटींचे कमिशन कार्यकर्त्यांना सोडले तर मग प्रत्येक कार्यकर्त्याकडे ३५ डिफेंडर दिसल्या असत्या. जेथे नियमबाह्य उत्पन्नाचे स्रोत निर्माण करून उत्पन्न मिळवल्या जाते तेथे व ईडी दृश्य अदृश्य स्वरूपात दाखल होते अशा प्रकरची प्रतिक्रिया विजयराज शिंदे यांनी दिली आहे.

तर भाजप नेते मुन्ना बेंडवाल यांनी आमदार संजय गायकवाड यांच्यावर थेट आरोप केले आहे. ते म्हणाले की, माझ्या मुलाला जाणीवपूर्वक टारगेट करून निलंबित करण्याचा कट रचला जात आहे, असा संताप बेंडवाल यांनी व्यक्त केला.

बेंडवाल यांनी सांगितले की, त्यांचा मुलगा नगरपालिका सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत होता. त्यानंतर त्याने सॅनिटरी इन्स्पेक्टर (SIT) कोर्स पूर्ण करून मुंबईला प्रस्ताव पाठवला. या प्रक्रियेसाठी आम्हाला तब्बल आठ वेळा मुंबईच्या फेऱ्या मारायला लावल्या. मी स्वतः चार वेळा आमदारांसोबत गेलो, मात्र दोन्ही फाईली




आमदारांनीच गहाळ केल्या आणि आम्हाला 'फाईल कुठे गेली?' असे सांगून आमची दिशाभूल केली, असा आरोप त्यांनी केला.

सध्या माझ्या मुलाला गैरहजर दाखवून निलंबित करण्याची कारवाई सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. मी सर्व कागदपत्रे आणि फिटनेस सर्टिफिकेट संबंधित अधिकाऱ्यांकडे दिले असतानाही आमदारांनी 'कामावर घेऊ नका' असे आदेश दिले, असेही बेंडवाल म्हणाले. याचवेळी त्यांनी नगर परिषद मध्ये कार्यरत सुनील बेंडवाल यांच्यावरही अप्रत्यक्ष टीका करत ते वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कसे टिकले? कोणाची कृपा आहे? असा सवाल उपस्थित केला. राजकीय आरोपांदरम्यान बेंडवाल यांनी मागील काळात बुलढाणा शहरातील दंगल प्रकरणाचाही उल्लेख करत मोठा दावा केला. त्या वेळी माजी नगरसेवक तथा नगराध्यक्षपती सज्जाद हजारो लोकांसह गायकवाड यांच्या घरी हल्ल्यासाठी निघाले होते, पण मीच त्यांना थांबवले, असे त्यांनी सांगितले.

# खामगावातील ७१ ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध; १३ एप्रिलपर्यंत हरकतींचे आवाहन

**खामगाव, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** खामगाव तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे, अशा एकूण ७१ ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना अधिसूचना आज, ७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. निवडणूक विभागाच्या नियमांनुसार ही प्रक्रिया राबविण्यात येत असून, नागरिकांना यावर हरकती नोंदवण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.

प्रभाग रचना जाहीर झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये पिंप्री देशमुख, अडगांव, आंबेटाकळी, आवार, भंडारी, बोथाकाजी, चिचपूर, ज्ञानगंगापूर, गणेशपूर, गारडगांव, गवंडाळा, घाटपुरी, गोंधनापूर, हिंगणा का., हिवरखेड, हिवरा खुर्द, जनुना, काळेगांव, कारेगांव बु., कोलोरी, कुंबेफळ, लाखनवाडा बु., मांडका, पाळा, पारखेड, राहुड, शहापूर, शिरजगांव दे., शिर्ला नेमाने, सुटाळा खुर्द, टेंभुर्णा, उमरा अटाळी, वाडी, वर्णा, अंबिकापूर, अंत्रज, आसा, भालेगांव, बोरजवळा, चितोडा, ढोरपगांव, घाणेगांव, हिवरा बु., जळका भडंग, कदमापूर, कंचनपूर, कंझारा, खोलखेड, लाखनवाडा खुर्द, लांजुड, निमकवळा, निपाणा, पळशी खुर्द, पातोंडा, पिंप्री गवळी, पिंप्री कोरडे, पोरज, रामनगर, संभापूर, शेलोडी, शिराळा, सुजातपूर, सुटाळा बु., टाकळी, वाकुड, दधम, बोरी, पि. राजा, निरोड, पिंप्राळा आणि विहीगांव यांचा समावेश आहे. अधिसूचना प्रसिद्धी ७ एप्रिल २०२६ रोजी संबंधित ग्रामपंचायतींमध्ये प्रभाग रचना अधिसूचना परिशिष्ट ६ व नमुना 'ब' प्रसिद्ध करण्यात आला आहे.हरकती व सूचना: प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रभाग रचनेवर काही आक्षेप किंवा सूचना असल्यास त्या लेखी स्वरूपात सादर कराव्यात.

अंतिम मुदत,हरकती सादर करण्यासाठी १३ एप्रिल २०२६ ही शेवटची तारीख आहे. नागरिकांनी आपल्या हरकती तहसील कार्यालय, निवडणूक विभाग, खामगाव येथे कार्यालयीन वेळेत दाखल कराव्यात.

संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व नागरिकांनी या अधिसूचनेची नोंद घ्यावी आणि लोकशाही प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी दिलेल्या मुदतीत आपल्या सूचना किंवा आक्षेप सादर करावेत, असे आवाहन तहसीलदार सुनील पाटील व प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जळगाव जामोद येथील ग्रा.प. पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**बुलढाणा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जळगाव जामोद तालुक्यातील रिक्त असलेल्या सरपंच आणि सदस्य पदांच्या पोटनिवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून २८ एप्रिल २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये भिंगारा ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासह तालुक्यातील कुंवरदेव, मडाखेड खुर्द, मांडवा, माहुली, गोळेगाव खुर्द, मडाखेड बु., निंभोरा बु. आणि जामोद या ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांसाठी ही निवडणूक होत आहे.

७ एप्रिल ते १३ एप्रिल या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत इच्छुक उमेदवारांना आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येतील. त्यानंतर १५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाईल आणि १७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. २८ एप्रिल रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान होईल आणि २९ एप्रिल रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येईल. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात आचारसंहिता लागू करण्यात आली असून, तहसीलदार पवन पाटील यांनी सर्व नागरिकांनी या निवडणूक प्रक्रियेची नोंद घ्यावी असे आवाहन केले आहे.

कुबेर अर्बन
पाहिजेत
पदसंख्या व शैक्षणिक पात्रतेचे विवरण खालील प्रमाणे

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | संख्या |
| --- | --- | --- | --- |
| १ | व्यवस्थापक | वाणिज्य शाखा पदवीधर | ३ |
| २ | लिपिक | १० वी पास | ३ |

पतसंस्थेतील व्यवस्थापक पदाचा २ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल
पत्ता : कुबेर महिला अर्बन, मेन मार्केट, चोप्रा कॉम्प्लेक्स, वेलनेस मेडीकलच्या खाली, बुलढाणा
भेटण्याची वेळ सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत
संपर्क : ७७५८००६६३५

# खामगावात उपविभागीय कार्यालयासमोर चुलीवर बनवल्या भाकरी

## गॅस टंचाईविरोधात वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन



**खामगाव ७ एप्रिल ( गुड इव्हीनींग सिटी ):** राज्यभरात जाणवणारा घरगुती आणि व्यावसायिक गॅसचा प्रचंड तुटवडा,वाढलेला काळाबाजार आणि यामुळे सर्वसामान्यांच्या विस्कळीत झालेल्या जनजीवनाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. त्या अनुषंगाने खामगाव येथे जोरदार आंदोलन करण्यात आले. नरेंदर कब मिलेगा सिलिंडर अशा घोषणा दिल्या तर महिला कार्यकत्यांनी उपविभागीय कार्यालयासमोर चूल पेटवून आणि त्यावर भाकरी भाजून केंद्र व राज्य सरकारच्या धोरणाचा निषेध नोंदवला. गॅस टंचाईमुळे राज्यातील परिस्थिती भयावह झाली आहे. अकोला येथे माजी सरपंच शंकरराव शिरसाठ आणि अमरावती येथे एका तरुणाचा गॅस सिलेंडरसाठी रांगेत उभे असताना उष्मघाताने व त्रासाने मृत्यू झाला. सरकार परिस्थिती सामान्य असल्याचे सांगत असले, तरी प्रत्यक्षात नागरिक तासनतास रांगेत उभे आहेत, असा आरोप आंदोलकांनी केला. गॅसअभावी चहाच्या टपऱ्या, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि हॉटेल्स बंद पडली आहेत.

'नरेंदर मोदी को टम्प का डर, नहीं मिल रहा गैस सिलेंडर' यामुळे केटरिंग व्यवसाय ठप्प झाल्याने लग्नकार्य व धार्मिक कार्यक्रम पुढे ढकलले जात आहेत. विशेषतः शहरात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या मेस बंद झाल्याने त्यांना उपाशी राहण्याची किंवा गावी परतण्याची वेळ आली आहे. रिक्षाचालकांनाही गॅस मिळत नसल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडली असून सर्वसामान्य जनतेच्या खिशला काती लागत आहे. यासाठी ''वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष देवा हिवराळे यांच्या मार्गदर्शनाखाली खामगाव येथील उपविभागीय कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनात बंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष देवराव हिवराळे, शरद वसतकार, शांताराम पाठेखेडे, उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती संघपाल जाधव, राजेश हेलोडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, दादाराव हेलोडे, आकाश सरदार शहराध्यक्ष, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष विशाखा सावंग सह महिला कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

राठोड हॉस्पिटल
(नवजीवन मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल)
(प्रसुतीगृह-महिला रूग्णालय, फॅक्चर ॲक्सीडेंट हॉस्पिटल, जनरल सर्जरी, ट्रामा सेंटर)
मध्ये होणार
आता मोफत उपचार
-: पत्ता :-
चोपडा ले आऊट,
छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ,
बस स्टॅन्ड जवळ, बुलढाणा ४४३००१
प्रेरणास्थान
श्री. उत्तमराव पांडुरंगराव राठोड
माजी शिक्षण अधिकारी
डॉ. रविंद्र उ. राठोड
MBBS D.Ortho
अस्थिरोग तज्ञ, ट्रॉमा व स्पाईन सर्जन
डॉ. मनिषा चव्हाण राठोड
MBBS DGO, FELLOWSHIP IN LAPROSCOPY
स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ, वंध्यत्व निवारण तज्ञ
लॅप्रोस्कोपी सर्जन
जनरल मेडिसिन विभाग
- अद्ययावत वातानुकूलीत अतीदक्षता विभाग
- विषबाधा, सर्पदंश निदान व उपचार
- हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह रोग निदान व उपचार
- मेंदुरोग, अर्धांगवायु निदान व उपचार
- दमा व क्षयरोग उपचार
- किडणीचे आजार निदान व उपचार
- गॅस्ट्रोस्कोपी
- स्ट्रेसटेस्ट
- डिजीटल एक्स-रे
जनरल सर्जरी विभाग
- मधुमेही पायाचे व्रण किंवा जखमेवर उपचार
- स्तनाचे विकार व गाठी (कॅन्सर) शस्त्रक्रिया
- मुळव्याध, भगंधर, फिशर शस्त्रक्रिया, कॅन्सर निदान, बायोप्सी
- पोटाचे विकार, अल्सर शस्त्रक्रिया
- आतड्याचे पिळ व गाठी (कॅन्सर) शस्त्रक्रिया
- हर्निया, अपेंडिक्स व हायड्रोसील उपचार व शस्त्रक्रिया
- पित्ताशयाचे खडे, विकार शस्त्रक्रिया
- मुतखडे व किडनीचे आजार उपचार व शस्त्रक्रिया
- थॉयराईड गाठ निदान, उपचार शस्त्रक्रिया
- शरीरावरील गाठ निदान उपचार व शस्त्रक्रिया
- लहान मुलांच्या शस्त्रक्रिया
- स्त्रीरोग चिकित्सा व शस्त्रक्रिया
अस्थिरोग व ट्रॉमा विभाग
- गुडघेदुखी, सांधेदुखी, मान-पाठदुखी, टाचदुखी निदान व विनाऑपरेशन उपचार
- हातापायाला मुंग्या येणे, बधिरता जानवणे, मानेच्या मनक्यामुळे डोके जड पडणे,
- चक्कर येणे इत्यादींवर विनाऑपरेशन उपचार
- हाडांचे विविध कॅन्सर निदान व उपचार
- फॅक्चर, ॲक्सिडेंट उपचार व शस्त्रक्रीया
- मनक्याचे आजार, उपचार व शस्त्रक्रीया
- रशियन तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रीया
- ऑर्थोस्कोपी दुर्बीनीद्वारे सांध्याची शस्त्रक्रीया
- ऑर्थोप्लास्टी सांधे बदलण्याची शस्त्रक्रीया
- डीजीटल एक्स-रे सुविधा
स्त्रीरोग व प्रसूती विभाग
- वेदनारहीन प्रसूती
- दुर्बीनिद्वारे सर्व प्रकारच्या बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया
- कुटुंब नियोजन
- सिझेरीयन शस्त्रक्रीया
- हायरीस्क प्रेग्नंसी युनिट
- वंध्यत्व निवारण केंद्र
- कुटूंब नियोजन केंद्र
- स्त्रीरोग उपचार
- रजोनिवृत्ती उपचार
- गर्भाशय संबंधीत कॅन्सर स्क्रीनींग, निदान व उपचार
- गर्भपिशवी व बिजांड (गाठीचे निवारण व शस्त्रक्रीया)
75 17 27 23 57
२४ तास अत्यावश्यक सेवा

# लुप्त होत चाललेली चुलीची परंपरा गॅसच्या तुटवड्याने केंद्रस्थानी

## सिलिंडरच्या टंचाईचे सावट

**देऊळगांव राजा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : अमेरिका, इस्त्रायल, इराण या आखाती देशांत निर्माण झालेला तणाव तसेच युद्धामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या आंतरराष्ट्रीय घडामोडीचे पडसाद आता थेट ग्रामीण भागात, खेडोपाडी उमटू लागले आहेत. गॅस, पेट्रोल, डिझेलच्या संभाव्य तुटवड्याच्या धास्तीने ग्रामीण जनजीवन पारंपारिक वळणावर येताना दिसत आहे. काळाच्या ओघात लुप्त होत चाललेली चूल पुन्हा एकदा केंद्रस्थानी आली आहे.

आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धस्थितीमुळे गॅस, पेट्रोल डिझेलच्या तुटवड्याची 'भीती' नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पुन्हा पारंपारिक पद्धतीकडे वळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ग्रामीण भागातील काही कुटुंबांनी स्वयंपाकासाठी गॅसऐवजी चुलीचा वापर सुरू केला आहे. म्हणूनच भर उन्हात जळणासाठी लागणारे लाकूड तसेच काड्या साठवण्याकडे कल वाढला आहे. काही दिवसा पूर्वी पेट्रोल, डिझेलचा तुटवडा निर्माण होणार, अशी अफवा वाऱ्यासारखी पसरली होती. त्यामुळे तालुक्यातील आणि परिसरातील पेट्रोल पंपांवर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या होत्या. आखाती देशांत निर्माण झालेला तणाव तसेच युद्धामुळे इंधनच नव्हे, तर स्वयंपाकाच्या गॅसचाही तुटवडा भासणार, अशा चर्चेने ग्रामीण भागातील गृहिणींनी सावध पवित्रा घेतला आहे. अनेक घरांच्या अंगणात पुन्हा सरपणाच्या मुठ्या दिसू लागल्या आहेत. चूल पेटू लागली आहे. केवळ चहापाण्यापुरता गॅस वापरला



जात आहे. जेवण्यासाठी चुलीचा वापर करण्याकडे कल वाढला आहे. तसेच इंडक्शनच्या शेगड्याही खरेदी होत आहेत. आंतरराष्ट्रीय तणावामुळे निर्माण झालेली ही भीती ग्रामीण जीवनशैलीवर परिणामकारक ठरत आहे. पूर्वी घरोघरी चुली पेटत होत्या. लाकूड हेच इंधन वापरात असायचे. काळांतराने यात बदल झाला. गॅस मुख्य भूमिकेत आला आहे.

# मोताळ्यात दोन लाखांचा गांजा जप्त; आरोपीस अटक



**मोताळा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : शहरात अवैधपणे गांजा विक्री करणाऱ्यास मोताळा पोलिसांनी गजाआड करून त्याच्याकडून ९ किलो ८०० ग्रॅम गांजा जप्त केला. गुप्त माहितीवरून पोलिसांनी आरोपीच्या घरी धाड टाकून १ लाख ९६ हजार रुपयांचा एवज जप्त केला. अजय रोहीदास मोहीते रा. कॉटन मार्केट परिसर, मोताळा असे आरोपीचे नाव आहे.

मोताळा शहरातील कॉटन मार्केट परिसरात अजय मोहिते याने राहत्या घरात गांजा साठवून ठेवल्याची गुप्त माहिती मोताळा पोलिसांना मिळीली. या माहितीच्या आधारे जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक तथ उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पो. नि. सिताराम मेहेत्रे, स.पो.नि. बालाजी शेंगेपल्लु, पो.उप. नि. राजेंद्र कपले, पोलीस अंमलदार हेकॉ नंदकिशोर धांडे, अमोल खराडे, सुपडसिंग चव्हाण, श्रीकांत चिटवार, विजय सुरळकर, चालक हेकॉ मनोहर पंडीत, अनिता मोरे, पोकॉ प्रमोद साळोक, रविंद्र नरोटे, आकांक्षा जऱ्हाड यांनी आरोपी अजय रोहीदास मोहीते याच्या घरात धाड टाकली. दोन पंचासमक्ष रेड करून घरातील ९ किलो ८०० ग्राम गांजा जप्त केला. पोलिसांनी एक लाख ९६ हजार रुपयांचा एवज जप्त केला.पो.उप. नि. राजेंद्र कपले यांच्या फिर्यादीवरून आरोपी अजय मोहिते विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# मनरेगाचे फेस ऑथेंटिकेशन तात्काळ रद्द करा : अमर कुळे

**मोताळा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (रोहयो) काम करणाऱ्या मजुरांसाठी सक्तीचे करण्यात आलेले फेस ऑथेंटिकेशन तात्काळ रद्द करावे, तसेच रोजगार सेवकांचे प्रलंबित मानधन त्वरित अदा करावे, अशी मागणी युवक काँग्रेसचे सचिव अमर राजीव कुळे यांनी केली आहे.



यासंदर्भात त्यांनी मोताळा तहसीलदारांना निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण भागात नेटवर्क आणि तांत्रिक अडचणी मोठ्या प्रमाणावर आहेत. अनेक ठिकाणी मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने किंवा ॲप व्यवस्थित चालत नसल्याने मजुरांची उपस्थिती नोंदवता येत नाही. परिणामी, काम करूनही मजुरी मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण होत आहे. तसेच रोजगार सेवकांनाही दिवसातून अनेक वेळा कामाच्या ठिकाणी जाऊन मजुरांचे फेस ऑथेंटिकेशन करावे लागत असल्याने त्यांच्यावर अतिरिक्त ताण येत आहे. नेटवर्क समस्यांमुळे हे काम अधिकच कठीण बनत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, रोजगार सेवकांचे मागील सुमारे १८ महिन्यांपासून मानधन प्रलंबित असून, यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. शासनाने दोन वर्षांपूर्वी मानधन वाढवण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, मजूर व रोजगार सेवकांवरील अन्याय थांबवण्यासाठी फेस ऑथेंटिकेशनची सक्ती तात्काळ रद्द करावी किंवा त्यात शिथिलता आणावी, तसेच प्रलंबित मानधन त्वरित खात्यात जमा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# दरवाढीने ग्राहक हैराण व्यावसायीक गॅस मिळेना : भाज्यांचे दरही वाढले

**बुलढाणा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : व्यावसायिक एलपीजी गॅसची तीव्र टंचाई आणि खाद्यतेलांच्या वाढत्या दरांचा दुहेरी फटका बुलढाणा शहरातील हॉटेल व्यवसायाला बसत असून, याचा थेट परिणाम सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर होत आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, अनेक हॉटेल चालकांनी आपल्या मेनूमधून चपातीसह काही प्रमुख पदार्थ वगळले असून, उर्वरित पदार्थांच्या दरात १० ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे हॉटेलमध्ये जेवण करणे सर्वसामान्यांसाठी महागडे ठरत आहे.

हॉटेलमध्ये प्रवेश करताच ग्राहकांना 'आज उपलब्ध' आणि 'उपलब्ध नसलेले' पदार्थ यांची स्वतंत्र माहिती वेटरकडून दिली जात आहे. विशेषतः चपाती, काही भाज्या आणि अधिक गॅस लागणारे पदार्थ सध्या मेनूमधून कमी करण्यात आले आहेत. कमी गॅसमध्ये तयार होणारे मर्यादित पदार्थच ग्राहकांसाठी उपलब्ध ठेवले जात आहेत. व्हेज थाळीच्या दरात सरासरी ५० रुपयांची वाढ झाली असून, नाश्ता व इतर खाद्यपदार्थांच्या किमतीतही वाढ झाली आहे. परिणामी, ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी ज्या किमतीत पूर्ण थाळी मिळायची, त्याच दरात आता कमी पदार्थ मिळत आहेत, अशी प्रतिक्रिया अनेक ग्राहकांनी व्यक्त केली. काहींनी तर, हॉटेलमध्ये काय मिळेल हे आधी विचारावे लागते, ही परिस्थिती नवीनच असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, हॉटेल व्यावसायिकांच्या मते, जागतिक पातळीवरील तणावपूर्ण परिस्थितीमुळे मागील काही दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. अनेकांना वेळेवर गॅस उपलब्ध होत नसल्याने पर्याय म्हणून लाकडी भट्ट्यांचा वापन सुरू करण्यात आला आहे.

# धाड येथे अन्नातून विषबाधा

## तिन चिमुकल्यांचा मृत्यू



**बुलढाणा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : जिल्ह्यातील धाड येथे अन्नातून विषबाधा झाल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून, एकाच कुटुंबातील तीन लहानग्या बहीण-भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, आईसह एका चिमुकलीवर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

मृतांमध्ये मोहंमद अली मोहंमद वसीम जमदार (४), मशिरा मोहंमद वसीम जमदार (७) आणि फातिमा मोहंमद वसीम जमदार (८) यांचा समावेश आहे. तर आई अफरीन मोहंमद वसीम जमदार (३४) व अश्मिरा वसीम जमदार (३) यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोहंमद वसीम जमदार यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना रविवारी रात्रीपासून पोटदुखी, मळमळ व उलट्यांचा त्रास सुरू झाला. सोमवारी सकाळी प्रकृती खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान अली व मशिरा यांचा मृत्यू झाला.

त्यानंतर आई व दोन मुलींना पुढील उपचारासाठी बुलढाण्यात हलविण्यात आले. मात्र, सायंकाळी उपचार सुरू असतानाच फातिमा हिचाही मृत्यू झाला. प्राथमिक तपासात अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, नेमके कारण शोधण्यासाठी अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# बुलढाणा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन

**बुलढाणा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र बुलढाणा द्वारा आंतरराष्ट्रीय क्रीडादिनचे आयोजन करण्यात आले. जगामध्ये शांतता व विकास निर्माण व्हावा या करीता सन २०13 पासून UNO ने आंतरराष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन दरवर्षी ६ एप्रिल रोजी करण्यात यावे असे जाहीर केले.

# माळ सावरगाव घाटात अपघाताचा भीषण प्रसंग टळला

**सिंदखेडराजा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज आणि ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष भाई दीपक केदार हे अकोला येथील अत्याचारग्रस्त कुटुंबाची भेट घेण्यासाठी जात असताना माळ सावरगाव घाटात एक मोठी दुर्घटना टळली. घाटातील वळणावरून आलेल्या ओव्हरलोड ट्रकने त्यांच्या गाडीला घासत गेल्याने क्षणभर भीतीचे वातावरण निर्माण झाले.



मात्र चालकाने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे गाडी तात्काळ बाजूला घेतली गेली आणि भाई दीपक केदार यांच्यासह सर्व कार्यकर्ते थोडक्यात बचावले. अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. घटनेची माहिती मिळताच भाई दिलीप खरात यांनी कार्यकर्त्यांसह तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी भाई दीपक केदार यांना सुरक्षितपणे आपल्या गाडीत बसवून पुढील प्रवासासाठी अकोल्याकडे रवाना केले. या प्रसंगानंतरही समाजकार्याची तळमळ कायम ठेवत ते नियोजित सभेसाठी निघाले, हे विशेष उल्लेखनीय ठरले.

दरम्यान, या घटनेची माहिती वाऱ्यासारखी संपूर्ण महाराष्ट्रात पसरताच सामाजिक माध्यमांवर चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्यासह शेकडो भीम सैनिकांचे फोन भाई दीपक केदार यांना येऊ लागले. ते सुखरूप असल्याची माहिती मिळताच कार्यकर्त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.

भाई दीपक केदार हे समाजावर कुठेही अन्याय झाला की तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पीडितांना न्याय मिळवून देण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. त्यामुळेच ते आंबेडकरी चळवळीतील एक विश्वासार्ह आणि लढवय्या नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या अपघाताची बातमी समजताच समाजात हळहळ व्यक्त होत असून समाजाचा खरा रक्षक सुरक्षित आहे अशी भावना कार्यकर्त्यांत व्यक्त होत आहे. यावेळी भाई दीपक केदार यांच्या सोबत भाई दिलीप खरात, सचिन मुळे, संकेत जाधव, समाधान मुळे, संजय गवई, बजरंग काळे, यांच्या सह कार्यकर्ते उपस्थित होते,

# वैष्णवी म्हस्के यांची राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड

**बुलढाणा, ७ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : पंकज लध्दड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट स्टडीज, येलगाव बुलडाणा येथील विद्यार्थिनी वैष्णवी राजेश म्हस्के हिने आपल्या गुणवत्तेची छाप राष्ट्रीय स्तरावर उमटवत महाविद्यालयासह संपूर्ण तालुक्याचा गौरव वाढवला आहे.



राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत तिची राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड झाली असून हे शिबिर कर्नाटकातील मंगळूर येथे नीट्टे डिम्ड टू बी युनिव्हर्सिटीमध्ये १३ ते १९ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. वैष्णवी म्हस्के हिने आपल्या उल्लेखनीय कामगिरीतून कौशल्य आणि नेतृत्व गुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे. तिच्या या यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पद्मनाभ गाडगे यांचे मार्गदर्शन तसेच उपप्राचार्य प्रा. सचिन दांडगे यांचे सहकार्य लाभले आहे.


## जाहिर नोटीस

### विद्यमान तहसिलदार बुलढाणा यांचे न्यायालयात

रा.प्र.क्र.एम.आर.सी.-८१/ बुलढाणा / १८७/ किरकोळ अर्ज-जन्म मृत्यु नोंदणी दुरुस्ती कायदा-२०२५/ २०२५-२६

**वादी/ अर्जदारः-**

**मोहम्म्द आकिल शेख इस्माईल**
**रा. तेलगु नगर, बुलढाणा ता. जि. बुलढाणा**

**विरुध्द -**

**प्रतिवादी/गैरअर्जदारः-**

**मुख्याधिकारी, न.प. बुलढाणा**

ज्याअर्थी अर्जदार मोहम्म्द आकिल शेख इस्माईल रा. तेलगु नगर, बुलढाणा ता. जि. बुलढाणा यांचा जन्म दिनांक ०२.१२.१९७१ रोजी मौजे बुलढाणा येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद कार्यालय, बुलढाणा येथे अनावधानाने जन्म-मृत्यू रजिष्ट्रमध्ये करावयाची राहून गेलेली असल्यामुळे अर्जदार यांना त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद कार्यालय, बुलढाणा येथील जन्म मृत्यू रजिस्टरमध्ये होऊन मिळणेस्तव व तसे निर्देश नगर परिषद कार्यालय, बुलढाणा यांना होणेस्तव जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये विदयमान न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रकरणासंदर्भात जर कोणाला हरकत, आक्षेप दाखल करावयाचा असल्यास त्यांनी या न्यायालयात कार्यालयीन वेळेत सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसाचे आत सादर करावेत. करीता ही नोटीस.

बुलढाणा
दिनांक : ११/०३/२०२६

Digitally signed by SUNIL RAMDAS AHER
Date: 11-03-2026 13:56:50
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी बुलढाणा